F/C


# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी - २२६१७९६९ फॅक्स-२६९०००७
E-mail: desk18@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


**तात्काळ - स्पीड पोस्ट /ई-मेलद्वारे**

क्रमांक: १८ /तंशिसं /डीबीटी /२०१८-१९/ २८०
दिनांक : ११ /०६/२०१९

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय :- **शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता महाडीबीटी पोर्टलद्वारे राबविण्यात येत असलेल्या योजनांसाठी अर्ज करण्यासाठी व तपासणी करण्यासाठी देण्यात आलेली मुदतवाढ....**

संदर्भ :- १) या संचालनालयाचे पत्र क्र.:१८/तशिसं/ईबीसी/डीबीटी/२०१९/१०४, दि. ०२/०३/२०१९
२) या संचालनालयाचे पत्र क्र.: १८/तशिसं/ईबीसी/डीबीटी/२०१८-१९/२३६ दि. २० /०५ /२०१९

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता महाडीबीटी पोर्टलद्वारे राबविण्यात येत असलेल्या योजनांसाठी संदर्भीय पत्र क्र.१ व २ नुसार विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी व संस्थांना अर्जांची ऑनलाईन तपासणी करुन अर्ज निकाली काढण्यासाठी मुदतवाढ देण्यात आलेली होती. तरीही काही विद्यार्थ्यांकडून विहीत मुदतीत अर्ज न भरल्याने तसेच ऑनलाईन भरलेल्या अर्जांची तपासणी संस्था स्तरावर प्रलंबित असल्याने, शासनाकडून अर्ज भरण्यासाठी व प्रलंबित अर्जाच्या तपासणी करुन निकाली काढण्यासाठी दि. **३०.०६.२०१९** पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

तरी या पत्राद्वारे सर्व विभागीय कार्यालयांना सूचित करण्यात येते की, आपल्या अखत्यारित येणाऱ्या सर्व संस्थांना व संस्थांमार्फत सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात यावे की ज्या पात्र विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर अद्याप अर्ज केलेला नाही त्यांनी विहित मुदतीत म्हणजे दि. **३०.०६.२०१९** पर्यत संपूर्ण अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावे व संस्थांनी विद्यार्थ्यांसाठी याबाबतची सूचना संस्थेच्या दर्शनी सूचना फलकावर जाहिर करावी व कोणताही पात्र विद्यार्थी लागू असलेल्या संबंधित योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही याची दक्षता संस्थेच्या प्राचार्यांनी स्वत: घ्यावी. तसेच, संबंधित संस्थांनी त्यांच्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन ऑनलाईन प्राप्त झालेल्या/होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे अर्जांची ऑनलाईन पध्दतीने तपासणी करुन दि. **३०.०६.२०१९** पर्यंत पुढील कार्यवाहीसाठी ऑनलाईनरित्या पाठवावे अन्यथा या तारखेनंतर प्रलंबित राहिलेले अर्ज सिस्टिमद्वारे नामंजूर करण्यात येतील व नामंजूर अर्जांची सर्वस्वी जबाबदारी संस्थेच्या प्राचार्यांची राहिल तसेच यानंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही याबाबतची नोंद विद्यार्थी / संस्थांनी घ्यावी. विभागीय कार्यालयांनी त्याबाबतच्या सूचना संबंधित संस्थांना द्याव्यात ( संस्थांना पाठविलेल्या पत्राची एक प्रत संचालनालयाला पाठविण्यात यावी. )

तसेच सर्व विभागीय कार्यालयांनादेखील सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन संस्थामार्फत ऑनलाईन प्राप्त झालेल्या/होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे अर्जांची ऑनलाईन पध्दतीने तपासणी करुन दि. **३०.०६.२०१९** पर्यंत पुढील कार्यवाहीसाठी ऑनलाईनरित्या पाठवावे अन्यथा या तारखेनंतर प्रलंबित राहिलेले अर्ज सिस्टिमद्वारे नामंजूर करण्यात येतील व नामंजूर अर्जांची सर्वस्वी जबाबदारी विभागीय कार्यालयाची राहिल याची नोंद घ्यावी.

( डॉ. अभय वाघ )
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.

टीप - अंतिम तारखेपर्यत न थांबता वंचित राहिलेल्या पात्र विद्यार्थ्यांनी अर्ज भरुन घ्यावे व संस्था / विभागीय कार्यालय यांनी त्यांच्याकडे प्राप्त होणारे अर्ज अंतिम तारखेपर्यत न थांबता तपासणी करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठवावे.